लेख

# अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, बुवाबाजी संघर्ष आणि कायदे

**– ॲड. निर्मलकुमार सूर्यवंशी, धुळे**

दूरध्वनी : ०२५६२– २७१३८०

---

महाराष्ट्रात 'महाराष्ट्र जादुटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समुळ उच्चाटन अधिनियम २००५' लागू करुन त्याची अंमलबजावणी त्वरीत करण्याचा आग्रह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने धरला आहे. हा कायदा लागू करणे समाजहिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. समाजात पारंपारिक अंधश्रद्धा व नव्याने येऊ घातलेल्या अंधश्रद्धा निरुपद्रवी नसतात, तर त्यांच्या योगाने अशा अंधश्रद्धांना बळी पडणाऱ्या व्यक्तींच्या मानसिक आणि शारीरिक जीवनावर विघातक परिणाम सुद्धा होत असतात. त्यांची अर्थहानीही होत असते व ते लुटले जातात. काही अघोरी अंधश्रद्धेमुळे गंभीरस्वरुपाच्या शारीरिक इजा होतात तर कधी जीवन गमावण्याची पाळी येते. भोळ्या व अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या स्त्रीयांची अब्रुही लुटली जाण्याची शक्यता निर्माण होते. अंधश्रद्धेला बळी पडल्यामुळे अनेक संसार उध्वस्त झाल्याची उदाहरणे आढळून येतात. परंतु अंधश्रद्धेला आधार घेऊन, जनतेची दिशाभूल करुन अंधश्रद्धेला बळी पडण्यास प्रवृत्त करणाऱ्या गुन्हेगारांना परिणामकारक प्रतिबंध करता यावा. त्यांनी गुन्हा केला तर त्यांना जबर शिक्षा देऊन त्यांच्यासारख्या गुन्हेगारांवर धाक बसावा म्हणून प्रचलित कायद्यामध्ये प्रभावी तरतूदी नाहीत ही बाब अतिशय गंभीर व खेदजनक आहे.

सध्या अंधश्रद्धांना बळी पडून ज्यांना शारीरिक इजा होते किंवा ज्यांचे मानसिक स्वास्थ्य नष्ट होते किंवा ज्यांचे आर्थिक शोषण केले जाते. त्या व्यक्तींना न्याय मिळण्यासाठी भारतीय दंड विधान (IPC) कायद्याचा जुजबी आधार घेतला जातो. अशा कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी भारतीय फौजदारी प्रक्रिया संहितेतल्या तरतूदीही अपूऱ्या पडतात. औषधी द्रव्ये व तिलस्मी उपचार (आक्षेपार्ह जाहीराती) अधिनियम १९५४ व महाराष्ट्र वैद्यकीय कायदा इत्यादींच्या आधारे खटले दाखल केल्यास कायद्यांतील पळवाटांमुळे असले गुन्हेगार सर्रास मोकळे सुटतात. गावतील भगत, भोंदूबाबा लाखोंनी जमा होणाऱ्या जनतेस चमत्कार, मंत्रोपचार, गंडे–धागेदोरे, करुन फसविले जाते व लुटले जाते. विशेषत: गरीब, अशिक्षीत व भोळ्या जनतेचे शोषण केले जाते. अशा भोंदूबाबांविरुद्ध कायदेशिर कारवाई करुन जनतेचे रक्षण करणारा कोणताही कायदा आज अस्तित्वात नाही.

या पार्श्वभूमीवर प्रस्तावित 'जादूटोणा आणि अनिष्ट अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन

अधिनियम–२००५' या कायद्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते म्हणून या संदर्भात प्रचलित कायद्यांचा कितपत उपयोग होऊ शकतो. यासह जादूटोणा विरोधी कायद्यातील तरतूदींवर चर्चा ही घडून यावी आणि प्रस्तावित कायद्याचे महत्त्व लक्षात यावे या उद्देशाने लेखन करण्याचा हेतू आहे.

महाराष्ट्रातील केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातही विविध ठिकाणी अंधश्रद्धांची मूळे अधिकच घट्ट रोवली जाऊ लागली आहेत. त्याचवेळी समाजातील जागरुक नागरीकांना आणि समाज कार्यकर्त्यांना प्रतिरोधही होत आहे. हा विरोध करताना तो सनदशीर मार्गाने व कायद्याची बूज राखून आणि कायदा सुव्यवस्थेला कुठलाही धक्का न पोचता केला जावा याबाबत अंधश्रद्धा निर्मूलन समिती विशेष काळजी घेते. म्हणून कायद्याच्या चौकटीत राहून अंधश्रद्धेची समाज विघातक परंपरा व प्रथा मोडीत काढण्यासाठी लोकशिक्षणासह प्रबोधन जितके महत्त्वाचे आहे तितकेच कायद्याचा वापरही महत्त्वपूर्ण ठरतो. केवळ कायदा करुन या प्रथा मोडीत निघतील असे नव्हे. परंतु, इतर साधनांसोबत कायद्याची हत्यारे प्रभावी ठरु शकतील. भोंदूगिरी, बुवाबाजी, मंत्रतंत्र, गंडे–ताईत, गुढ औषधी, नवस, प्राणी हत्या इत्यादी मार्गाने जनतेची फसवणुक होत असल्याचे पाहून समितीचे क्रियाशिल कार्यकर्ते व त्यांचे समर्थक अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी कायद्याचा आधार शोधू लागतात. त्यावेळी प्रचलित फौजदारी कायदे हे प्रत्येक प्रकरणी सहाय्यभूत ठरु शकत नाही, याचा अनुभव कार्यकर्त्यांना पदोपदी येतो. उदाहरणार्थ– जोपावेतो एखाद्या व्यक्तीस शारिरिक इजा होत नाही किंवा त्याचा मृत्यू घडून येत नाही तोपावेतो फौजदारी दंडसंहितेप्रमाणे तक्रार करता येत नाही. प्रत्यक्षात आर्थिक लूट होत असताना सुद्धा फसवणूकीच्या गुन्ह्यात असे भगत मांत्रिक किंवा गुन्हेगारांना अडकविण्यासाठी त्या गुन्ह्याच्या तरतूदी अपूऱ्या पडतात. फौजदारी दंडसंहितेत समाविष्ट असलेल्या व तो गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले घटक अशा बाबांनी केलेल्या गुन्ह्यांमध्ये उपलब्ध नसतात. म्हणून या कायद्यातील तरतूदींचा वापर करता येत नाही. मंत्रतंत्राद्वारे किंवा इतर साधनांद्वारे अंधश्रद्धेचा आधार घेऊन किंवा धार्मिक श्रद्धांचा आधार घेऊन लूट करणाऱ्यांच्या कृत्यांना आजच्या कायद्यानुसार समाज विघातक प्रवृत्ती म्हणून सिद्ध करणे कठिण जाते. त्यामुळे त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करता येत नाही. म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा कार्यकर्ता अडचणीत येतो. डोळ्यासमोर होत असलेला उघड अन्याय त्याला व्यथीत करतो, तो सहन करण्यापलीकडे त्याला पर्याय उरत नाही.

औषधी द्रव्याबाबत आक्षेपार्ह जाहीरातींना प्रतिबंध करणारा कायदा जरी अस्तित्वात असला तरी त्या कायद्याचा उपयोग करण्यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होतात. अशा प्रकारचे गुन्हे दाखल करण्यासाठी सरळ पोलीसांद्वारे कारवाई करण्याआधी काही तांत्रिक बाबींची

पूर्तता करावी लागते. या कायद्यासंबंधीची माहीती सर्वसामान्यांना आणि पोलीस अधिकाऱ्यांनीही नसते. या कायद्यात जोडलेल्या सूचीतील आजारांच्या माहीतीबाबत सर्वत्र अज्ञान आहे. या कायद्याची आजपावेतो प्रभावी उपयुक्तता सिद्ध झालेली नाही. या कायद्यात जे अपवाद दिलेले आहेत, त्या अपवादांचा गैरवापर करुन आरोपीस सुटण्याची सोयही केलेली आहे. बोगस डॉक्टरांसंबंधी त्यांना प्रतिबंध करणाऱ्या कायद्याच्या ज्या तरतूदी आहेत त्यातूनही सूटका होण्याचे अनेक मार्ग गुन्हेगारांना उपलब्ध आहेत. अशाही परिस्थितीत आहे त्या कायद्यांचा उपयोग करुन, या कायद्यांच्या प्रभावाखाली अंधश्रद्धेचा आधार घेऊन गुन्हे करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशिर कारवाई व्हावी व त्यासाठी कार्यकर्त्यांचे प्रबोधन व्हावे असाही उद्देश आहे.

नुसता कायदा करुन भागत नाही; तर त्याची अंमलबजावणी कशी केली जाते, त्यासाठी कोणती प्रक्रिया पार पाडावी लागते. कोणते दस्तऐवज लागतात, कोणता पुरावा लागतो व कोणत्या अधिकाऱ्याशी संपर्क साधावा लागतो याचीही माहिति कार्यकर्त्यांना असावी लागते. त्यासाठी त्या कायद्याचा अभ्यास करावा लागतो, तो समजावून घ्यावा लागतो. त्यासाठी काही पद्धती आहे. त्याचेही ज्ञान कार्यकर्त्यांना व्हावे म्हणून काही विशेष लेखन करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शिका तयार करून त्यामध्ये उपयोगी कायद्यांच्या तपशीलांसह आवश्यक अर्ज नमूने समाविष्ट करण्याचा विचार आहे.

एकंदरीत अंधश्रद्धा निर्मूलनाचे मौलिक व मूलभूत सामाजिक विषयाशी संबंधित असलेल्या या चळवळीत भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यास समाज शिक्षण व प्रबोधन करण्यासाठी काही एक कौशल्य असावे लागते, त्याचप्रमाणे यासंबंधी कायदेशिर उपाययोजना करुन ही प्रथा मोडीत काढण्यासाठी कायद्याचे ज्ञान आणि संबंधितांकडून कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणूनही कौशल्य असावे लागते. असे कौशल्य देवाधर्माच्या नावावर बुवाबाजी करणाऱ्यांच्या विरोधात कार्यकर्त्यांना प्राप्त व्हावे यासाठी ही धडपड.

**– ॲड.निर्मलकुमार सूर्यवंशी,**
विधी अध्ययन व संशोधन केंद्र, धुळे
दूरध्वनी : ०२५६२– २७१३८०